॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. ६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील हे उपस्थित होते.

कुलगुरूंनी दिपावलीचा सण पर्यावरणपूरक व दुष्काळाचे सावट असल्याने आपल्या कुटुंबासह साजरा करावा. हा सणांचा सण असून अज्ञानावर ज्ञानाचा,निराशेवर आशेचा व अंधारावर प्रकाशाचा विजय मिळणारा आहे. असे सांगून विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी कमी संख्येत असतांना देखील विद्यार्थ्यांना सेवा देणारा ज्ञानरूपी दिव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश टाकत असल्याचे समाधान व्यक्त केले. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी शुभेच्छा देतांना दिवाळी सण आनंदाने व उत्साहाने साजरा करावा असे सांगितले.

विद्यापीठास दिवाळी सणा निमित्त दि. ९ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. संबंधितांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ६ नोव्हेंबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता